पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
Pune metropolitan Regional Development Authority, Pune
स.नं. १५२ - १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे - ४११००७.
PUNEMETROPOLIS
S.No. 152 - 153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411007
Ph No: 020 - 259 33 344 / 356 / 333 / फोन नं. : ०२० - २५९ ३३ ३४४ / ३५६ / ३३३ Email :hqpmrda@gmail.com

1/2

# भोगवटा प्रमाणपत्र

**( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )**

**जा.क्र : बीएमयु/मौ. हिंजवडी/स.नं. ११९ ते १७१ व १७३ सेक्टर आर-२/प्र.क्र. १२७३/२०१५-१६/ दि. ०२/०८/२०१८**

**प्रति,**

मे. फ्लॅगशिप इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. तर्फे
संचालक शशांक पुरूषोत्तम परांजपे
रा. राजीव गांधी इंफोटेक पार्क, फेज १, हिंजवडी, पुणे ५७

मौजे हिंजवडी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील स.नं. ११९ ते १७१ व १७३ सेक्टर आर-२ क्षेत्र १३०७५० चौ.मी. या जागेवर इमारत क्र. टी - १८ व टी १९ या इमारतीचे बांधकाम / सुधारित बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील अकृषिक आदेश क्र. पमह/टीएस/एसआर/०३/२०१५ दि. ३/३/२०१५ अन्वये आपणास परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण अनिरूद्ध वैद्य ॲन्ड असो. लायसन्स नं. CA/८५/८९६८ परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम पूर्ण /अंशतः पूर्ण केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि. २३/७/२०१८ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे .

## उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन

| अ.क्र | इमारत | मंजूरीप्रमाणे | प्रत्यक्ष जागेवर | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|
| I. | टी-१८ | लोअर बेसमेंट + अपर बेसमेंट + स्टील्ट + ३० मजले | लोअर बेसमेंट + अपर बेसमेंट + स्टील्ट + ३० मजले | १२३ |
| II | टी-१९ | लोअर बेसमेंट + अपर बेसमेंट + स्टील्ट + ३० मजले | लोअर बेसमेंट + अपर बेसमेंट + स्टील्ट + ३० मजले | १२३ |

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे — पु म प्र वि प्रा

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने**

२/८/१८
महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.

**प्रतः- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**
ग्रामसेवक, मौजे सुस ता मुळशी, जि-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि- ०२/०८/ २०१८ रोजीचे पत्र क्र. १२६३ सोबतचे 2015-16

परिशिष्ट 'ब'

१) अर्जदार /सदनिका धारक/गाळे धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) उंच इमारतींच्या अनुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी पत्र.क्र. FFM/५५/२०१८ दि. ८/७/२०१८ अन्वये दिलेल्या अग्नीशमन नाहरकत प्रमाणपत्रातील अटीं व शर्तींची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

५) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक/विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक/ विकासक श्री. शशांक परांजपे यांनी दि २३/७/२०१८ रोजी रुपये- ५००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून भोगवटा /अंशतः भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

६) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

७) विषयांकित प्रकल्पामध्ये अर्जदार यांनी यापूर्वी पर्यावरण विभागाकडील दिनांक ३/१०/२००७ रोजीचे पत्र क्र. २१-३८२/२००७ अन्वये प्रमाणपत्र प्राप्त केले असून त्यामधील तसेच पर्यावरण विभागाकडील परिपत्रक क्र.SEIAA-२०१४/CR-०२/TC-३, दिनांक ३०/०१/२०१४ मधील अटीं व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे प्रकल्पाचे अर्जदार /मालक/ विकासक व वास्तुविशारद/ अभियंता/ स्ट्रक्चरल अभियंता/सुपरवायझर यांचेवर बंधनकारक राहील.

८) विषयांकित जागेतील उर्वरित इमारतींचे बांधकाम मंजूर नकाशानुसार पूर्ण करुन त्यास भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदार /मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक आहे.

९) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

१०) सदर प्रकरणी विकासक यांनी दि. ३१/७/२०१८ रोजी दिलेल्या हमीपत्रानुसार MPCB कडून Consent to Operate घेणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पुमप्रविप्रा

महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.